# महाराष्ट्र शासन

deepali.jape@nic.in
०२२-२२०१४४२०

क्रमांक- परीक्षा ६७१८/प्रक्र १२४/आस्था-१०
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१,
दिनांक:- २७ नोव्हेंबर २०१८

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२ मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषद

विषय - सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात तरतूदींमध्ये सुधारणा करण्याबाबत

संदर्भ: १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २३१८/प्रक्र ३/का १७ दि. १ मार्च २०१८
२. शासनाचे समक्रमांकाचे पत्र दि. ३१.८.२०१८

सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात तरतूदींमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय दि. १ मार्च २०१८ सामान्य प्रशासन विभागामार्फत निर्गमित करण्यात आला असून सर्व जिल्हा परिषदांनी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दि. १ मार्च २०१८ च्या शासन निर्णयाची तात्काळ तंतोतंत अंमलबजावणी सुरु करुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या संदर्भ क्र. २ च्या पत्राने कळविण्यात आले आहे.

या संदर्भात दि. १ मार्च २०१८ पूर्वी ४५ वर्षे पूर्ण केलेल्या पण परीक्षेतून सूट देण्याचे आदेश अद्याप निर्गमित करण्यात आले नाहीत अशा कर्मचाऱ्यांबाबत कोणत्या नियमांनुसार कार्यवाही करावी याबाबत विविध जिल्हा परिषदांकडून शासनास विचारणा करण्यात आली आहे. या संदर्भात कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय स्वयंस्पष्ट असून या शासन निर्णयानुसार शासन सेवेत कायम करणे किंवा नियमित करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या सेवाप्रवोशोत्तर परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर मिळणारी सूट यापुढे (म्हणजे दि. १ मार्च २०१८ पासून पुढे) वयाची ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर अनुज्ञेय राहणार आहे. म्हणजेच ज्या कर्मचाऱ्यांनी दि . १ मार्च २०१८ पूर्वी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत त्यांच्याबाबत पूर्वीच्या नियमांनुसार कार्यवाही करण्यात यावी व दि. १ मार्च २०१८ पासून पुढे संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(दीपाली जपे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
कार्यासन आस्था-१० संग्रहार्थ